# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

ईमेल cap.exam@mu.ac.in


क्र. परीक्षा/कें.मु.कें./2026MARFMTS00028118 दिनांक : ०७ मार्च, २०२६

## परिपत्रक :-

विषय:— मुंबई विद्यापीठाअंतर्गत घेण्यात येणा—या प्रथम सत्र २०२६ (उन्हाळी सत्र) च्या परीक्षांचे मुल्यमापन OSM (On Screen Marking) प्रणालीतून करण्याबाबत........

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानीत /विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट महविद्यालयांचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख/संस्थेचे संचालक, दूरस्थ ऑनलाईन शिक्षण संस्थेचे संचालक, (CDOE) प्राचार्य सर ज.जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे उपपरिसरांचे संचालक/समन्वयक, विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आबेंडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, प्रथम सत्र २०२६ च्या परीक्षा **दि. १० मार्च, २०२६** पासून सुरू होणार असून उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन हे OSM प्रणालीमार्फत करण्यात येत आहे/येणार आहे. **OSM प्रणालीबाबत काही महत्वाच्या सूचना पुढीलप्रमाणे** :—

१) प्रथम सत्र २०२६ परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यमापन हे एकाच कंपनीमार्फत OSM प्रणालीनुसार होणार असून त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे :—

अ) **URL Link for OSM :- https://uom.osdes.in/ ही प्रथम सत्र आणि द्वितीय सत्र २०२५ ची वापरण्यात यावी.नवीन महाविद्यालयांना Link त्यांच्या** E-mail ID वर पाठविण्यात येईल.

ब) महाविद्यालयाचे प्राचार्य आणि तांत्रिक समन्वयक यांचा Login ID आणि पासवर्ड हा द्वितीय सत्र २०२५ चा असेल

क) **Help Desk Number for Technical Supports :- 08069459918**

ड) Help Desk E-mail ID:- mu.osdeshelpdesk@gmail.com

२) मुल्यांकनासाठी शिकविण्याचा किमान ०२ वर्षाचा अनुभव असलेल्या शिक्षकांना त्यांच्या विषयावर प्रत्येक सत्रास नाव नोंदणी करणे ही संपूर्ण जबाबदारी ही प्राचार्यांची असेल. नाव नोंदणी करताना चुकीचा विषया निवडला जाणार नाही याची संपूर्ण काळजी प्राचार्यांनी घ्यावी.

...२/—

# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

ईमेल cap.exam@mu.ac.in




३) मानधनाकरिता शिक्षकांनी आपले बॅंकेचे तपशिल काळजीपूर्वक अचूक भरावेत. चुकीच्या तपशिला अभावी आपणांस मानधन न मिळाल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल.

४). संगणक आधारित मुल्यांकनादरम्यान (OSM) प्रत्येक परीक्षकाने उत्तरपुस्तिका शेवटच्या पानापर्यंत पूर्णपणे तपासून प्रत्येक प्रश्नाचे मुल्यांकन करणे बंधनकारक आहे.

५). चुकीचे व अर्धवट केलेले मुल्यांकन आढळल्यास संबंधीत शिक्षकांस विद्यापीठात उपस्थित राहून सदर उत्तरपुस्तिका पुन्हा तपासावी लागेल. व त्यासाठी विद्यापीठ TA/DA किंवा कोणतेही मानधन देणार नाही. उत्तरपुस्तिका अचूक व संपूर्ण तपासाव्यात.

६). संगणक आधारित मुल्यांकन (OSM) करताना प्रत्येक प्रश्नाचे गुण उत्तर पूर्ण झाले आहे त्याच पानावर देण्यात यावे. विद्यार्थ्यांने लिहिलेल्या प्रत्येक प्रश्नास गुण देणे बंधनकारक आहे. (विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यार्थ्यांने प्रश्नाचे उत्तर लिहिले असताना देखील गुणदर्शिकेमध्ये NA असा उल्लेख केलेला असतो असे होणार नाही याची प्रत्येक शिक्षकाने काळजी घ्यावी.)

७) Online and Offline Attendance :- परीक्षा केंद्रावरील विद्यार्थ्यांची उपस्थिती ही बंधनकारक असून ती ऑफलाईन तसेच ऑनलाईन अशा दोन्ही पद्धतीने भरणे बंधनकारक आहे. Offline Attendance https://attportal.osdes.in/mu या Link वरून Print Out घेऊन परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. तसेच Online Attendance साठी उपरोक्त दिलेल्या Link मध्ये उपस्थिती नोंदविणे देखील बंधनकारक आहे. तसेच परीक्षा विभागाच्या असेहि निदर्शनास आले आहे की, Attendance fill करताना विद्यार्थी Absent असताना Present दाखविणे किंवा Present असताना Absent दाखविणे अशा चुका महाविद्यालयांकडून वारंवार घडत आहेत.

Link for Online and Offline Attendance https://attportal.osdes.in/mu आहे.

८) Auto Generated QR Code Sticker Attendance Link वरून QR Sticker Download करून विद्यार्थ्यांकडून त्याच्या आसनक्रमांची खातरजमा करून उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर सूचना केलेल्या ठिकाणी चिकटवून विद्यार्थ्यांची Attendance Sheet वर स्वाक्षरी घेण्याची संपूर्ण जबाबदारी Junior Supervisor हयांची असेल. QR Sticker हे परीक्षा Block मध्येच विद्यार्थ्यांच्या समक्ष चिकटवावेत. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा चालू होण्यापूर्वी किंवा नंतर चिकटवू नयेत. तसेच QR Code Sticker वर खाडाखोड करू नये. आयत्यावेळेस परीक्षा केंद्रावर पाठविलेल्या विद्यार्थी, किंवा परीक्षेपूर्वी विषय बदलल्यामुळे विद्यार्थ्यांस QR Sticker उपलब्ध होत नसल्यास Attendance Link वरून Buffer या Tab वरून विषयाची/विद्यार्थ्यांची माहिती देऊन नवीन Buffer Sticker Generate करावा. व तो त्या विद्यार्थ्याच्या उत्तरपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर चिकटवावा.

९) विद्यापीठ परिपत्रक क्र. १६४८–अ/दि. २७ मार्च २०१८ नुसार प्रत्येक महाविद्यालयाने संगणक आधारीत मुल्यांकन (OSM) सुरू करणे बंधनकारक असून महाविद्यालयांनी त्यांच्या कोटयाइतक्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन करणे अपेक्षित आहे. तसेच विद्यापीठाशी संलग्नित असलेले प्रत्येक महाविद्यालय हे ऑनलाईन (Online) मुल्यांकनासाठी मुल्यांकन केंद्र (CAP Centre) असेल.

...३/–

मुंबई विद्यापीठ
केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.
ईमेल cap.exam@mu.ac.in



१०) महाविद्यालयातील मुल्यांकन केंद्र (CAP Centre) हे CCTV च्या निगराणीखाली असावे. CCTV Footage मागितल्यास उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.

११) निकाल वेळेत घोषित करण्यासाठी महाविद्यालयांनी कॅप सेंटर रोज सकाळी ७ ते रात्री ८ पर्यत सुरू ठेवावे. तसेच सर्व कॅप सेंटर्स शनिवार, रविवार आणि सुट्टयांच्या दिवशी देखील चालू ठेवावीत.

१२) परिपत्रक क्र. ४७७/२०१९/दिनांक २६ फेबुवारी २०१९) नुसार महाविद्यालयांनी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी संख्येच्या १.५ पट उत्तरपुस्तिका तपासणे बंधनकारक आहे. (उदा. १०० विद्यार्थी संख्या, ५ विषय, ५०० उत्तरपुस्तिका १.५ टक्के प्रमाणे ७५० उत्तरपुस्तिका).

१३) मुल्यांकन वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने जर एखादा शिक्षक वेळेअभावी किंवा अनुकुल परिस्थितीत त्यांच्या महाविद्यालयाव्यतिरिक्त इतर महाविद्यालयात मुल्यांकनासाठी येत असल्यास अशा शिक्षकांना त्यांच्या ओळखपत्राच्या आधारावर मुल्यांकनासाठी संगणक लॅब उपलब्ध करून दयावी.

१४). प्राचार्यानी वेळोवेळी आपल्या क्लस्टरमधील लीड कॉलेजच्या प्राचार्यांच्या माध्यमातून विचारलेली माहिती पुरवावी जेणेकरून आवश्यकता भासल्यास वेळीच उपाययोजना करणे सोयीचे होईल.

१५) मराठी व इंग्रजी भाषेत लिहिलेल्या उत्तरपुस्तिका वेग वेगळया गठ्ठयात मोहोरबंद करून विद्यापीठात पाठविण्यात याव्यात.

१६). **दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेच्या आतील ३,५,७,९, १० आणि १५ व्या पानावर LD (Learning Disability) असा शिक्का मुद्रित करणे बंधनकारक असून उपस्थिती तक्ता** (Attendance Sheet) वर सुध्दा L.D. चा उल्लेख करावा.

१७). परीक्षेशी संबधित अध्यादेश (Ordinance relating to examination) O.5050 अन्वये अवैध साधन सामुग्री (unfairmeans) प्रकरणांच्या उत्तरपुस्तिका हया ज्युनिअर सुपरवायझर व सिनियर सुपरवायझर यांनी स्पष्ट मत मांडून विद्यापीठात पाठवताना स्वतंत्र पाकिटात पाठविणे. उपस्थिती तक्ता (Attendance Sheet) वेगळा पाठवावा.) तसेच विद्यार्थ्याकडे भ्रमणध्वनी देखील आढळल्यास तसा पत्रात उल्लेख करून भ्रमणध्वनी विद्यापीठाकडे जमा करावा.

१८). उत्तरपुस्तिकेची ने–आण करण्यासाठी तसेच हाताळण्यासाठी उत्तरपुस्तिकांचे बंडल १०० उत्तरपुस्तिकेंपेक्षा जास्त नसावे.

संगणक आधारित मुल्यांकन OSM (On Screen Marking) सुरळीत पार पडण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकांना, प्राचार्य आणि IT Co-ordinator यांना येणा–या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी खालील निम्ननिर्देशित तक्त्यानुसार अभ्यासक्रमनिहाय Zoom Meeting च्या माध्यमातून कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेची Link कार्यशाळेच्या दोन दिवस अगोदर महाविद्यालयाचे प्राचार्य आणि तांत्रिक समन्वयक यांच्या ईमेलवर पाठविण्यात येईल.

...४/–

# मुंबई विद्यापीठ

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

ईमेल cap.exam@mu.ac.in




| अनु क्र. | दिनांक | वेळ | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १ | १६ एप्रिल, २०२६ | २.३० वाजता | B.Sc., M.Sc. Etc. |
| २ | ०९ एप्रिल, २०२६ | २.३० वाजता | B.Com, B.B.I. B.A.F. B.M.S. & M.Com. |
| ३ | १६ एप्रिल, २०२६ | २.३० वाजता | B.A., M.A. etc |
| ४ | १३ एप्रिल, २०२६ | २.३० वाजता | Pharmacy & M. Pharma |
| ५ | ०८ एप्रिल, २०२६ | २.३० वाजता | Law., LL.B & LL.M.. |
| ६ | २७ एप्रिल, २०२६ | २.३० वाजता | M.C.A |
| ७ | ११ मे, २०२६ | | Engineering M.E. |

yaraundale

डॉ. पुजा रौंदाळे
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

दि. ०७ मार्च, २०२६
मुंबई –४०० ०९८.

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानीत /विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, समाजशास्त्र, गृहविज्ञान व नृत्य, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन, स्थापत्यशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट महविद्यालयांचे प्राचार्य, मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख/संस्थेचे संचालक, दूरस्थ ऑनलाईन शिक्षण संस्थेचे संचालक, (CDOE) प्राचार्य सर ज.जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, विद्यापीठाच्या रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे उपपरिसरांचे संचालक/समन्वयक, विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आबेंडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र.

प्रत माहितीकरिता अग्रेषित:–

१) मा. अधिष्ठाता,/सहयोगी अधिष्ठाता मानव्य विद्याशाखा,
२) मा.अधिष्ठाता/सहयोगी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
३) मा.अधिष्ठाता/सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
४) मा. अधिष्ठाता,/सहयोगी अधिष्ठाता, आंतर–विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा,
५) स्वीय सहायक, मा.कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई –४०० ०३२,.
६) स्वीय सहायक, मा.प्र कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई –४०० ०३२,.
७) स्वीय सहायक, मा.सचांलक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यानगरी,मुंबई –४०० ०९८.